# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

## इ.६वी ते१०वी प्रवेशचाचणीविषयी पालकांना सूचना

१. विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेल्या सत्रानुसार, मिळालेल्या स्थळी चाचणीपूर्वी ३० मिनिटे हजर राहावे. सत्राची वेळ प्रवेशपत्रावर पाहावी.

२. **चाचणीच्या** वेळी येताना प्रकाशचित्र लावलेले ओळखपत्र, **काळ्या रंगाचे दोन बॉलपेन्स** आणावेत.

३. योग्य रांगेत योग्य क्रमांकावर बसवून घेण्यासाठी विद्यार्थ्याला त्याच्या प्रवेशपत्रावरील **गटक्रमांक** आणि **आसनक्रमांक** चांगल्या प्रकारे लक्षात असणे आवश्यक आहे . तसेच त्याचे प्रवेशपत्र त्याच्याजवळ असणे आवश्यक आहे. (पावती नसली तरी चालेल. प्रवेशपत्र मात्र अत्यावश्यक आहे.)

४. पालकांनी विद्यार्थ्यांच्या हातात आवश्यक साहित्य व प्रवेशपत्र देऊन त्याला प्रबोधिनीच्या वास्तूत सोडल्यानंतर चाचणी संपेपर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या अडीअडचणींची काळजी प्रबोधिनीतील अध्यापक आणि कार्यकर्ते घेत असतात. पालकांनी चौकात गर्दी केल्यास विद्यार्थ्यांना सूचना देणे अवघड होते व विद्यार्थी भांबावून जातात. त्यामुळे पालकांनी चौकात थांबू नये.

५. चाचणी संपल्यानंतर आपल्या पाल्यास घेऊन जाण्यासाठी पालकांनी चौकामध्ये यावे .

६. कोणत्याही परिस्थितीत चाचणीचे सत्र बदलून मिळणार नाही.

७. उत्तरपत्रिका संगणकाद्वारे तपासली जाणार असल्याने विद्यार्थ्यांना योग्य उत्तराच्या ठिकाणी काळ्या शाईच्या बॉलपेनाने गोल भरावयाचा आहे. त्याचा सराव विद्यार्थ्यांकडून अवश्य करून घ्यावा. नमुन्यादाखल खाली उत्तरपत्रिका दाखविली आहे.



प्रज्ञा मानस संशोधिका
ज्ञानप्रबोधिनी
510, सदाशिव पेठ, पुणे, 30.

नाव : मिलिंद मंदार नाईक    दिनांक : 03/03/13

उत्तरे भरण्यासाठी सूचना
1) आपले उत्तर शेजारी दिलेल्या उदाहरणाप्रमाणे भरावे.
2) प्रत्येक प्रश्नाचे एकच उत्तर बरोबर आहे व एकदा दिलेले उत्तर बदलता येणार नाही.
3) गोल काळा करण्यासाठी काळया रंगाच्या बॉलपेनचा वापर करा. काळा केलेला गोल बदलण्याचा प्रयत्न करू नका.
4) कृपया पूर्ण गोल काळा करा, पेन्सिलचा वापर करू नका.
5) कृपया उत्तरपत्रिकेवर कच्चे काम आणि खाडाखोड करू नका.
6) आधी काळा केलेला गोल पुसण्यासाठी खोडरबर किंवा व्हाईटनर चा उपयोग करू नका.
7) एका उत्तराला एकापेक्षा जास्त गोल काळे केल्यास ते चुकीचे धरले जाईल आणि त्याला गुण दिले जाणार नाहीत.

चुकीच्या पद्धती

योग्य पद्धत

क्रमांक: 1 2 3 0 4

Example: X = A ● C    Y = A B ●

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | A | B | C | 26 | A | B | C | 51 | A | B | C |
| 2 | A | B | C | 27 | A | B | C | 52 | A | B | C |
| 3 | A | B | C | 28 | A | B | C | 53 | A | B | C |
| 4 | A | B | C | 29 | A | B | C | 54 | A | B | C |
| 5 | A | B | C | 30 | A | B | C | 55 | A | B | C |
| 6 | A | B | C | 31 | A | B | C | 56 | A | B | C |

## ज्ञान प्रबोधिनी प्रशाला
## इ.६वी ते१०वी प्रवेश चाचणीचे तपशील

| | |
|---|---|
| | **चाचणी** |
| **चाचणीचे विषय :** | मानसशास्त्रीय चाचणी |
| **माध्यम :** | मराठी किंवा इंग्रजी |
| **वेळ :** | एकूण सुमारे २ तास |
| **स्वरूप :** | वस्तुनिष्ठ , बहुपर्यायी , छोट्या कालावधीच्या अनेक चाचण्या |
| **साहित्य :** | काळ्या रंगाचे दोन बॉलपेन्स |
| **चाचणीचा दिवस :** | **संकेतस्थळावर जाहीर केला जाईल.** |
| **वेळ :** | **संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.** |
| **निकालाचा दिवस :** | **संकेतस्थळावर जाहीर केला जाईल.** |

### कोवीड काळात परीक्षेला येताना पाळावयाचे नियम

१) सर्वांनी योग्यरितीने मास्क घालणे **अत्यावश्यक** आहे. मास्कशिवाय आल्यास परीक्षा केंद्रावरती कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.

२) आपला पाल्य आजारी असल्यास परीक्षेला पाठवू नये. आजारी विद्यार्थ्यांना परत पाठविले जाईल.

३) परीक्षेच्या किमान एक तास आधी विद्यार्थ्याने परीक्षा केंद्रावर येणे आवश्यक आहे. आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व तपासण्या करून मगच परीक्षा केंद्रात प्रवेश मिळेल. (जसे थर्मल स्कॅनिंग, ऑक्सिमीटर तपासणी , सॅनिटायझेशन)

४) डबा आणू नये. विद्यार्थ्यांनी स्वत:जवळ पाण्याची बाटली ठेवावी.

५) आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित अंतर पाळावे.

.